खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे

# साहेबरावजी बुट्टेपाटील महाविद्यालय

राजगुरुनगर, ता.खेड जि.पुणे ४१०५०५

# वाणिज्य विभाग

## द्वितीय वर्ष वाणिज्य

## सत्र ३

### विषय

### कंपनी कायद्याचे घटक–I

### प्रकरण २

### कंपनीची निर्मिती आणि संस्थापना

# कंपनीची निर्मिती आणि संस्थापना

**प्रस्तावना:**

कंपनी ही व्यक्तींची स्वयंसेवी संघटना असून, ती व्यावसायिक उपक्रमांच्या हेतूंनी स्थापित झालेली असते. कंपनीला भिन्न नाव आणि मर्यादित जबाबदारी असते. तसेच ती एक वेगळी स्वतंत्र वैधानिक घटक म्हणून तिचे अस्तित्व ठेऊन असते. तिचे स्वतःचे हक्क आणि कर्तव्ये असतात. १९५६ च्या कंपनी अधिनियमाने, कंपनी संस्थापना आणि नोंदणी करीता निश्चित अशी प्रक्रिया नमूद केलेली आहे. या अधिनियमानुसार, कंपनीची निर्मिती कमीतकमी दोन संचालक आणि कमीतकमी रू. १ लाखाच्या भरणा केलेल्या भांडवलाने सुरूवात होते. एकल व्यक्ती कंपनीची स्थापना २०१३ च्या कंपनी अधिनियमातील तरतूदीनुसार, धर्मादाय हेतूने संस्थापित केली जाऊ शकते. ज्या कंपनीची स्थापना धर्मादाय हेतूने झाली असेल त्या कंपनीच्या उद्दिष्टांमध्ये पर्यावरण संरक्षण, शिक्षण, संशोधन, समाजकल्याण यांसारखी उदिष्ट समाविष्ट केली जातात.

## ***<u>कंपनी निर्मितीमधील पायऱ्या</u>***

कंपनीच्या स्थापनेच्या पद्धतीतील महत्त्वाच्या अवस्था पुढीलप्रमाणे आहेत :

**अ) प्रवर्तन :**

कंपनीच्या स्थापनेपूर्वी जी प्राथमिक कार्ये करावी लागतात त्याला कंपनीचे प्रवर्तन असे म्हणतात. प्रवर्तन म्हणजे, व्यावसायिक संधीचा शोध घेणे आणि त्यामार्फत नफा प्राप्त करून घेण्याच्या हेतूने निधी, मालमत्ता आणि व्यवसाय संबंधित व्यवस्थापन क्षमतांचे संघटन करणे होय. ज्या व्यक्तीवर प्रवर्तनाची प्राथमिक जबाबदारी असते तिला "प्रवर्तक" असे म्हणतात. प्रवर्तन हे नेहमी प्रवर्तकांच्या मार्फत केले जाते. प्रवर्तक हा वास्तविक स्वरूपात कंपनीची जबाबदारी घेतो. प्रवर्तकांचे ३ भागांमध्ये वर्गीकरण करण्यात आले आहे.

१) व्यावसायिक प्रवर्तक : जेव्हा कंपनीची स्थापना होते तेव्हा व्यावसायिक प्रवर्तक हे त्यांचा व्यवसाय म्हणून कंपनीची निर्मिती करतात. त्यांना कंपनीची निर्मिती करण्याच्या बदल्यात कमिशन किंवा एखादी ठराविक रक्कम मिळते.

२) नैमित्तिक प्रवर्तक : नैमित्तिक प्रवर्तक हे कंपनी निर्मितीचे कार्य प्रासंगिकरित्या हाती घेतात आणि कंपनी निर्मितीचे काम हे अर्धवेळ नोकरी म्हणून करतात.

३) व्यवस्थापकीय प्रवर्तक : व्यवस्थापकीय प्रवर्तक हे कंपनीच्या स्थापनेसाठी आवश्यक असणारे सर्व तपास, तयारी आणि व्यवस्थापन करतात.

ब) नोंदणी :

कंपनीच्या निर्मिती मधील दुसरी पायरी म्हणजे कंपनीची नोंदणी करून घेणे होय. कंपनीची नोंदणी करण्यासाठी प्रवर्तक अनेक प्रकारची कागदपत्रे सादर करतात. ती कागदपत्रे पुढीलप्रमाणे :

१) सादर करावी लागणारी कागदपत्रे

i) कंपनीचे घटनापत्र ii) कंपनीची नियमावली III) नोंदणीकृत कार्यालय

iv) वैधशनिक घोषणापत्र v) संचालकांची यादी. vi) संचालकांची लेखी संमती

vii)पात्रता भाग विकत घेण्याची अभिवचने

२) नोंदणी शुल्काचा भरणा

३) संस्थापनेचे प्रमाणपत्र

जर वर नमूद केलेली सर्व कागदपत्रे निबंधकाने मंजूर केली तर तो संस्थापनेचे प्रमाणपत्र वितरित करतो. संस्थापना झाल्यानंतर एखादी खासगी कंपनी व्यवसाय सुरु करू शकते, परंतु सार्वजनिक कंपनीला व्यवसाय प्रारंभ दाखला आवश्यक असतो.

क) भांडवल उभारणी :

संस्थापनेचे प्रमाणपत्र मिळाल्यानंतर खासगी कंपनीला व्यवसाय सुरू करता येतो. मात्र, सार्वजनिक कंपनीला व्यवसाय प्रारंभ दाखला मिळाल्याशिवाय व्यवसाय सुरू करता येत नाही. व्यवसाय प्रारंभ दाखला मिळविण्यासाठी सार्वजनिक कंपनीला भांडवल उभारणी करणे आवश्यक असते. भांडवल उभारणीसाठी पुढील गोष्टींची आवश्यकता असते. i) अध्यक्ष, बँकर, हिशेब तपासनीस, चिटणीस. इ. च्या नियुक्तीचा ठराव. ii) विविध करारांचा ठराव. iii) शेअर बाजारातील समभागांची सूची करणे. iv) माहितीपत्रकाचे मुद्रण करून ते जारी करणे. v) समभागांसाठीच्या अर्जाचा स्वीकार. vi) समभागांचे वाटप. vii)भागवाटपासबंधीचे पत्र पाठविणे. vili) भागवाटप झाल्यानंतर दोन महिन्यांच्या आत भागधारकांना शेअर प्रमाणपत्र देणे.

ड) व्यवसाय प्रारंभ अवस्था :

व्यवसाय प्रारंभ करण्यासाठी आवश्यक असणारी कागदपत्रे निबंधकांना योग्य वाटली तर तो कंपनीला व्यवसाय प्रारंभ दाखला प्रदान करतो. कंपनीला व्यवसायास प्रारंभ करण्याचे अधिकार मिळाले आहेत याचा हा दाखला निर्णायक पुरावा असतो.

## प्रवर्तन

कंपनीच्या स्थापनेपूर्वी जी प्राथमिक कार्ये करावी लागतात त्याला कंपनीचे प्रवर्तन असे म्हणतात व ही कार्ये करणाऱ्या ग व्यक्ती किंवा संस्थेला 'प्रवर्तक' म्हणतात. कंपनीची निर्मिती आणि विकास कार्यात प्रवर्तकांना अत्यंत महत्त्वाची भूमिका पार पाडावी लागते. कंपनीच्या निर्मितीसाठी आवश्यक असलेल्या प्रारंभिक कार्यापासून तो कंपनीचा कारभार सुरळीतपणे सुरू करून देण्यापर्यंतच्या सर्व कार्याची जबाबदारी प्रवर्तक स्वीकारतात.

**व्याख्या** :

प्रवर्तकाच्या व्याख्या पुढीलप्रमाणे :

१) एल. जे. बोवन

"प्रवर्तक ही कायद्याची संज्ञा नसून ती व्यावसायिक संज्ञा होय आणि कंपनीच्या निर्मितीसाठी वाणिज्य विश्वाला सुपरिचित असलेल्या ज्या बहुविध व्यावसायिक क्रियांचा अवलंब करावा लागतो त्या सर्वांचा या संज्ञेत उपयुक्तपणे समावेश झालेला आहे.

२) सी. जे. कॉकबर्न :

"एखादी योजना किंवा प्रकल्प प्रत्यक्षात आणण्यासाठी कंपनी स्थापन करण्याची जबाबदारी स्वीकारून जों त्यासाठी आवश्यक ती पावले उचलतो त्यास कंपनी प्रर्वतक असे म्हणतात."

## ***प्रवर्तकाच्या जबाबदाऱ्या***

१) प्रतिधारित मत्ता परताव्याचे दायित्व :

या अधिनियमाच्या कलम ५४३ नुसार, कंपनीचा विस्तार होत असताना न्यायालयाच्या असे निदर्शनास आले की, अशी एखादी व्यक्ती जिने कंपनीच्या स्थापनेमध्ये, प्रवर्तनामध्ये सहभाग घेतलेला आहे आणि कंपनीच्या कोणत्याही मत्तेचा किंवा वित्ताचा तिच्याकडून गैरवापर होतो आहे किंवा कंपनीशी संबंधित बाबींमध्ये विश्वासघात केला आहे, तर अशा परिस्थितीत, न्यायालय त्याला प्रतिधारित मत्तेचा परतावा देण्यास सांगते. हा परतावा त्याला नुकसान भरपाईच्या स्वरूपात देत असताना काही विशिष्ट व्याजदराने अथवा कंपनीला पुनर्मत्तेच्या रूपामध्ये परत द्यावा लागतो.

२) कर्तव्य भंग किंवा फसवणूक अशा तोट्यांना जबाबदार :

जर कंपनीला प्रवर्तकाच्या कर्तव्य भंगामुळे किंवा कार्यातील फसवणुकीमुळे काही तोटा झाला तर अशा तोट्याला तो कारणीभूत ठरतो. त्याचप्रमाणे माहितीपत्रकातील दिलेल्या चुकीच्या

कायदेविषयक माहितीमुळे, भागधारकाला त्या फसवणुकीमुळे तोटा सहन करावा लागला तर त्याचा प्रत्यक्ष रूपात किंवा थेट स्वरूपात संबंध प्रवर्तकाशी जोडला जातो. पर्यायाने झालेल्या नुकसानीची कारणमीमांसा करण्यासाठी तो जबाबदार असतो.

३) माहिती पत्रकातील विसंगत व चुकीच्या विधानांची जबाबदारी :

माहितीपत्रकात दिलेल्या मूळ किंवा वास्तव नियतभागाची माहिती जर चुकीच्या विधानांच्या स्वरूपात असेल, तर त्याला प्रवर्तक जबाबदार असतो. नंतरच्या नियतभागाच्या विस्ताराला तो जबाबदार असणार नाही. प्रवर्तकाच्या झालेल्या कृतीमुळे जे नुकसान झालेले असते त्याबद्दल त्याच्या विरोधात नियतभागी नुकसानभरपाईसाठी दावा दाखल करू शकतात. तो त्याच्यावर जी फौजदारी स्वरूपाची कारवाई होईल, तिला जबाबदार असतो. त्याला रूपये ५००० /- इतक्या दंडासहित माहितीपत्रकात खोटी विवरणे दिल्याबद्दल दोन वर्षांपर्यंत तुरूंगवासाची शिक्षा होऊ शकते.

४) कंपनी प्रवर्तनातील फसवणूकीची जबाबदारी :

या अधिनियमाच्या कलम ४७८ नुसार, कंपनींचा समापन करत असताना परिसमापन अधिकाऱ्याच्या असे निदर्शनास आले की, कंपनीचे प्रवर्तन करत असताना किंवा संस्था स्थापन करत असताना, कंपनीची आहे, तर अशा वेळेस तो, या विषयासंबंधीचा अहवाल न्यायालयात सादर करू शकतो. कंपनी समापनाच्या दरम्यान न्यायालयात सादर केलेल्या अहवालात जर प्रवर्तक दोषी आढळला तर न्यायालय त्याच्या विरोधात कारवाई करते.

५) नफा खातेविषयक जबाबदारी :

कंपनीचा प्रवर्तक हा कंपनीचा विश्वस्त म्हणून काम करत असतो. कंपनीला माहिती न देता त्याने कोणतेही नफ्याचे गुप्त व्यवहार करू नयेत. प्रत्येक नफा विषयक व्यवहाराची माहिती त्याने पूर्ण स्वरूपात कंपनीला द्यावी. जर त्याने असे केले नाही तर तो अशा गुप्त नफ्याकरिता जबाबदार मानला जातो.

## ***<u>प्रवर्तकाची कर्तव्ये :</u>***

१) गुप्त नफ्याचे प्रकटीकरण करणे :

गुप्त नफ्याचे प्रकटीकरण करणे हे प्रवर्तकाचे महत्त्वाचे कर्तव्य आहे. कंपनीच्या प्रवर्तनाचे काम चालू असताना, त्याने कंपनीच्या खर्चातून कोणत्याही प्रकारचा खासगी नफा करून घेऊ नये कारण तो कंपनीचा विश्वस्त म्हणून काम पाहत असतो. जर त्याने प्रवर्तनाच्या काळात काही लाभ मिळवून घेतलाच तर त्याची माहिती लपवून न ठेवता त्याने सर्वांसमोर सांगितली पाहिजे.

२) सर्व महत्त्वपूर्ण गोष्टींचे प्रकटीकरण करणे :

कंपनीची संस्थापना करताना किंवा प्रवर्तन करताना प्रवर्तकाने पूर्ण रूपात अचूकपणे सर्वच साधनसामग्रीची माहिती जाहीर करणे गरजेचे आहे. त्याला विक्रीतून मिळणारा नफा वेगळा काढण्याची परवानगी नाही. प्रवर्तक कंपनीच्या माहिती पत्रकातून जी भागांची माहिती दिली जाते त्या माहितीत जर त्रुटी किंवा खोटेपणा झालेला आहे असे दिसून आल्यास, त्यामुळे होणाऱ्या नुकसानभरपाईला तो जबाबदार असतो.

३) मेहनतपूर्ण कृतीची जबाबदारी :

प्रवर्तकाला कंपनीच्या संस्थापने पासून ते त्याची उभारणी होईपर्यंत मेहनतपूर्ण कृती कराव्या लागतात. त्याने सर्व खासगी व्यवस्थांची माहिती कंपनीच्या निर्मितीपश्चात कंपनीला देणे गरजेचे आहे.

४) स्वतःच्या पदाचा गैरवापर न करण्याची जबाबदारी :

कंपनी निर्माणाच्या दृष्टीने, प्रवर्तकाकडे विस्तृत अधिकार असतात. या अधिकारांचा योग्य आणि अचूक मर्यादेत वापर करणे, ही त्याची जबाबदारी आहे. त्याने त्याच्या पदाचा कदापीही गैरवापर करू नये. कंपनी संबंधित विविध कृती करताना त्या कृती त्याने प्रामाणिकपणे करणे गरजेचे आहे.

५) मालमत्तेच्या विक्रीवरील तोट्याची नुकसानभरपाई देणे :

जर कंपनी प्रवर्तकाकडून कंपनीच्या मालमत्तेच्या विक्रीमध्ये काही नुकसान झाले तर प्रवर्तक हा या तोट्याची नुकसान भरपाई देण्यास जबाबदार असतो. अशा वेळी कंपनी प्रवर्तकाविरूद्ध फिर्याद नोंदवू शकते.

## ***<u>कंपनी स्थापनेपूर्वीचे करार :</u>***

अ) अर्थ :

कंपनीच्या स्थापनेपूर्वी कंपनीच्या प्रवर्तकांना अनेक कामे करावी लागतात. त्यासाठी त्यांना निरनिराळे करार करावे लागतात. कंपनीची निर्मिती आणि विकास यामध्ये ते आवश्यक असतात. अशा प्रकारे प्रवर्तकांनी कंपनीसाठी काही मालमत्ता किंवा हक्क निर्माण करण्यासाठी कंपनीच्या स्थापनेपूर्वी काही करार केले असतील तर अशा करारांना स्थापनेपूर्व करार किंवा प्राथमिक करार असे म्हणतात

ब) स्थापनेपूर्वीच्या कराराचे परिणाम :

१) कंपनीच्या स्थापनेपूर्वी केलेले करार कंपनीवर बंधनकारक नसतात. कारण त्यावेळी कंपनी अस्तित्वातच नसते.

२) कंपनीची नोंदणी झाल्यानंतर स्थापनेपूर्वी केलेल्या करारांना कंपनी मंजुरी देऊ शकत नाही. करार करण्याच्यावेळी कंपनी अस्तित्वात नसल्यामुळे अशा करारास ती मंजुरी देऊ शकत नाही.

३) जर प्रवर्तकांनी कराराच्या अंतर्गत काही जबाबदारी घेतली असेल तर त्यासाठी प्रवर्तक स्वतः वैयक्तिकरित्या जबाबदार धरले जातात.

४)कंपनीच्या स्थापनेपूर्वी झालेले करार पूर्ण करण्यासाठी कंपनी दावा दाखल करू शकत नाही.

## कंपनीची संस्थापना किंवा नोंदणी

संस्थापना म्हणजे एखाद्या कॉर्पोरेट घटकाला तिच्या मालकांपासून विभिन्न करून वैधानिक किंवा कायदेशीर दर्जा देण्याची प्रक्रिया होय. कंपनीची संस्थापना ही कंपनी निर्मितीमधील दुसरी पायरी आहे. यामध्ये कंपनी निबंधकाकडून कंपनीची नोंदणी केली जाते. नोंदणीसाठी प्रवर्तकाला पुढील पायऱ्यांचा वापर करावा लागतो.

## कंपनी संस्थापनेची प्रक्रिया

१) आवश्यक सभासदांची संख्या :

प्रवर्तकाला कंपनीची किंवा सार्वजनिक कंपनीची संस्थापना करताना कमीतकमी त्याच्या सहित सात सदस्यांची आवश्यकता असते; तर खासगी कंपनीची संस्थापना करताना कमीतकमी दोन सदस्यांची आवश्यकता असते.

२) नावाची निवड आणि मंजुरी :

प्रवर्तकाला कंपनी निबंधकाकडून ज्या नावाने नवीन कंपनीची सुरूवात करायची आहे ते नाव वैध आहे किंवा नाही याची खात्री करावी लागते.

३) घटनापत्रक तयार करणे आणि कंपनीची नियमावली :

कंपनीचे घटनापत्रक आणि कंपनीची नियमावली हे दोन दस्तऐवज कंपनीच्या नोंदणीकरणाच्या वेळी अत्यंत गरजेचे असतात. घटनापत्रकामधून कंपनीची घटना तयार होते आणि कंपनीच्या नियमावलीतून कंपनीच्या अंतर्गत व्यवस्थापनाकरिता गरजेच्या असणाऱ्या नियमांची निर्मिती होते. हे दोन्हीही दस्तऐवज मुद्रांकित, स्वाक्षांकित आण साक्षांकित केलेले असावेत.

४) नव्याने निर्माण होणाऱ्या कंपनीच्या संचालकांची लेखी संमती :

कंपनीचे संचालक होण्यास तयार असणाऱ्या संचालकांची यादी आणि भागाने मर्यादित सार्वजनिक कंपनी असल्यास संचालकांची लेखी संमती कंपनी निबंधकाकडे नोंदणीच्या वेळेस सादर करावी लागते.

५) योग्य व्यक्तीचे वैधानिक घोषणापत्र :

कंपनी निर्मितीत सहभागी असणाऱ्या सनदी लेखापरीक्षक किंवा कंपनी सेक्रेटरी किंवा उच्च अथवा सर्वोच्च न्यायालयांचे वकील जे पूर्ण वेळ भारतात व्यवसाय करत आहेत किंवा कंपनी नियमावलीत नमूद केलेल्या संचालकांपैकी संचालक, व्यवस्थापकीय संचालक, व्यवस्थापक किंवा कंपनीचा सचिव यांपैकी कोणी एका व्यक्तीचे वैधानिक घोषणापत्र कंपनी निबंधकासमोर सादर होणे गरजेचे असते. वरील कागदपत्रांबरोबरच दिलेल्या दराने नोंदणी शुल्क भरणे आवश्यक असते.

## <u>कंपनी संस्थापनेकरिता सादर करावी लागणारी कागदपत्रे</u>

१) कंपनीचे घटनापत्रक :

कंपनीचे घटनापत्रक हे साक्षीदार आणि कंपनीच्या सदस्यांची स्वाक्षरी असलेले, इलेक्ट्रॉनिक्स माध्यमांच्या आधारे त्यांच्या नावावर असलेल्या समभागांची संख्या असणाऱ्या फाईलला जोडलेले असेल. या घटनापत्रकावर त्या राज्यात लागू होणाऱ्या शुल्कानुसार मुद्रांकन केलेले असावे. कंपनीशी संबंधित व्यक्तींची छायाचित्रे देखील जोडलेली असावीत. त्याचबरोबर कंपनीच्या घटनापत्राची मूळ किंवा अस्सल प्रत देखील संबंधित कंपनी निबंधकाकडे सादर केलेली असावी.

२) कंपनीची नियमावली :

कंपनीची नियमावली देखील साक्षीदार किंवा कंपनीच्या सदस्यांच्या सह्या असणारी नियमावली त्यांच्या नावावरती असणाऱ्या भागांच्या संख्येनिशी इलेक्ट्रॉनिक माध्यमातून सादर केलेली असावी. ही सुद्धा योग्य रीतीने अधिकृत भागभांडवलानुसार स्वाक्षांकित केलेली असावी. याला देखील साक्षीदारांची किंवा संबंधित व्यक्तींची छायाचित्रे जोडलेली असावीत. तसेच कंपनीच्या नियमावलीची मुद्रांकित केलेली अस्सल प्रत संबंधित कंपनी निबंधकाकडे सादर केली जावी.

३) घोषणापत्र :

i) व्यावसायिक वकील, सनदी लेखापाल, कंपनी सेक्रेटरी की, जे संस्थापनेत सहभागी आहेत, किंवा

ii) यादीत ज्या व्यक्तींची नावे संचालक, व्यवस्थापक किंवा सचिव आहेत अशांचे घोषणापत्र. या घोषणापत्रांमध्ये कंपनीच्या स्थापनेसंदर्भात आवश्यकतांचे पालन केले आहे असे नमूद करावे.

४) प्रतिज्ञापत्र :

कंपनी नियमावलीत ज्यांचा उल्लेख प्रथम संचालक म्हणून आलेला आहे आणि सदस्य असलेल्या संबंधित प्रत्येक व्यक्तीचे प्रतिज्ञापत्रक की ज्यात i) कोणत्याही कंपनीच्या मागील ५ वर्षांच्या काळात त्याने कोणत्याही प्रकारचा गुन्हा अथवा फसवणूक केलेली नाही याचाही उल्लेख असावा. ii) त्याच्या माहितीनुसार प्रतिज्ञापत्र कर्त्याने निबंधकासमोर सादर केलेल्या कागदपत्रातील माहिती ही अचूक आणि बरोबर आहे.

५) कराराची प्रत :

कंपनीने जर एखाद्या व्यक्तीला व्यवस्थापकीय किंवा पूर्ण वेळ संचालक किंवा व्यवस्थापक म्हणून नियुक्त करण्याचा करार केला असेल तर ही कराराची प्रत पीडीएफ फाईलला जोडणे आवश्यक असते.

६) मुखत्यार पत्र :

कंपनीच्या सर्व सदस्यांद्वारे कोणत्याही एका सभासदाच्या किंवा ज्या व्यक्तीला ही कागदपत्रे सादर करावयाची आहेत त्या व्यक्तीच्या आणि निबंधकाच्या नावाने मुखत्यार पत्र प्रस्तुत करणे आवश्यक असते. आणि त्यानंतर संस्थापनेचे प्रमाणपत्र प्राप्त करावे लागते. मुखत्यार पत्र हे योग्य मूल्याच्या बिगर न्यायालयीन मुद्रांकावर दिलेले असावे आणि ते निबंधकाकडे सादर करावे.

७) इतर करार :

संस्थेच्या निवेदन पत्रिकेत किंवा नियमावलीत नमूद केलेले इतर करार हे पीडीएफ फाईलच्या स्वरूपात निबंधकाकडे असणे आवश्यक असते कारण हा करार मूलभूत दस्तऐवजाचा भाग बनू शकतो.

## <u>कंपनी संस्थापन प्रमाणपत्र</u>

कंपनी निबंधकाकडे सर्व आवश्यक कागदपत्रे सुपूर्त केली आणि योग्य ते शुल्क भरल्यावर, कंपनी निबंधक सर्व गोष्टींची खात्री केल्यावर, कंपनीच्या नावाची नोंदणी त्याने तयार केलेल्या नोंदणी पुस्तकात करतो आणि त्यानंतर कंपनीची नोंदणी झाली आहे याचे प्रतिक म्हणून त्याने सही केलेले कंपनी नोंदणीच्या प्रमाणपत्राचे म्हणणे कंपनीची योग्य पद्धतीने नोंदणी झाल्याचा एक अधिकृत पुरावा ठरते. त्यामुळे कंपनी इतर कंपन्यांशी करार करण्यास सक्षम बनते. त्याचप्रमाणे कंपनीला इतर कंपन्यांप्रमाणे अधिकार आणि जबाबदाऱ्या प्राप्त होतात. (कलम ३५) ज्या खासगी किंवा सार्वजनिक कंपनीकडे भागभांडवल नसते अशी कंपनी तिची नोंदणी झाल्यानंतर लगेच व्यवसायास प्रारंभ करू शकते.

## कंपनी संस्थापनेचे परिणाम

कंपनी नोंदणीचे परिणाम खालील मुद्यांच्या सहाय्याने स्पष्ट करता येतील :

१) स्वतंत्र कायदेशीर अस्तित्व :

कायद्याखाली कंपनीची नोंदणी झाल्यानंतर कंपनीला स्वतःचे एक स्वतंत्र अस्तित्व प्राप्त होते जे ती कंपनी निर्माण करणाऱ्या व्यक्तीपासून स्वतंत्र असते. नोंदणीमुळे कंपनी एक कृत्रिम व्यक्ती म्हणून अस्तित्वात येते आणि मनुष्य प्राण्यांप्रमाणे कार्य करु शकते. कंपनीचे सर्व व्यवहार तिच्या नावावर सुरु होतात.

२) मर्यादित जबाबदारी :

हा कंपनीच्या नोंदणीचा सर्वात महत्त्वाचा परिणाम आहे. याचाच अर्थ कंपनीच्या सभासदांची जबाबदारी मर्यादित स्वरुपाचे असते. त्यांची जबाबदारी त्यांनी प्राप्त केलेल्या भागभांडवलाच्या मूळ किंमतीएवढी असते. सभासदांनी एकदा भागभांडवलाची पूर्ण किंमत भरल्यानंतर त्यांच्या वैयक्तिक मालमत्तेतून कोणत्याही प्रकारच्या तोट्यासाठी रक्कम मागितली जात नाही.

३) कायमचे अस्तित्व :

नोंदणीकृत कंपनी संपुष्टात येऊ शकत नाही. नोंदणीमुळे तिला कायमचे अस्तित्व प्राप्त होते. कायमचे अस्तित्व म्हणजे कंपनीच्या सभासदत्वामध्ये वेळोवेळी बदल होऊ शकतात मात्र कंपनीच्या अस्तित्वावर त्याचा काही परिणाम होत नाही. अशाप्रकारे कंपनीचे जीवन तिच्या सभासदांच्या जीवनाशी संबंधीत नसते. कायद्याने कंपनी अस्तित्वात येते आणि कायद्यानेच ती संपुष्टात येते. तिच्या सभासदांचे मृत्यू, दिवाळखोरी, निवृत्ती, भागांचे हस्तांतरण यामुळे कंपनीच्या अस्तित्वावर कोणताही परिणाम होत नाही.

४) स्वतंत्र मालमत्ता :

कंपनी नोंदणीकृत झाल्यानंतर ती एक कायदेशीर घटक बनते. तिला सर्वप्रकारच्या मालमत्ता धारण करणे, त्यांचा उपभोग घेणे आणि त्यांचे नियोजन करणे याचा अधिकार प्राप्त होतो. कंपनी तिचे भांडवल आणि मत्ता यांची मालक बनते. कंपनीचे भागधारक कंपनीच्या मालमत्तेचे खाजगी किंवा संयुक्तरित्या मालक नसतात

५) हस्तांतरणीय भाग :

खाजगी कंपनी वगळता इतर कंपन्यांचे भाग सहजासहजी मुक्तपणे हस्तांतरीत करता येतात. सभासद कोणालाही त्यांचे भाग विकू शकतात. त्यासाठी त्याला दुसऱ्या सभासदांची परवानगी घ्यावी लागत नाही. कंपनी त्यांच्या भाग हस्तांतरणाच्या अधिकारावर पूर्णपणे मर्यादा आणू शकत नाही.

६) व्यावसायिक व्यवस्थापन :

कंपनी क्षेत्र हे व्यावसायिक व्यवस्थापकांना मोठ्या प्रमाणावर आकर्षित करण्याचे क्षेत्र आहे. अनेक तरुण व्यवस्थापन पदवीधर स्वेच्छेने कंपनीमध्ये काम करु इच्छितात कारण त्यामुळे आपणही व्यवस्थापकीय वर्गामध्ये मोडतो याची भावना वाढीस लागते. सभासदांचे कंपनीवर नियंत्रण असते; परंतु ते केवळ औपचारिक स्वरुपाचे असते. येथे ते स्वतंत्रपणे कार्य करु शकतात. या स्वतंत्र वातावरणामुळे त्यांना व्यवस्थापकीय क्षमतांचा विकास करण्याची संधी प्राप्त होते.

७) दावा दाखल करणे :

नोंदणीकृत कंपनीला स्वतःच्या नावाने न्यायालयामध्ये दावा दाखल करून दाद मागता येते किंवा कंपनीविरुद्ध दावा दाखल होऊ शकतो.

८) वित्त :

नोंदणीमुळे कंपनी व्यवसाय सुरु करण्याचे एकमेव असे माध्यम बनते ज्यांना भाग आणि कर्ज रोखे यांच्या माध्यमातून लोकांकडून वर्गणी गोळा करून भांडवल उभारण्याचे विशेष हक्क प्राप्त होतात. त्याचप्रमाणे सार्वजनिक वित्तीय संस्था इतर प्रकारच्या व्यावसाय संस्थापेक्षा कंपनीला कर्ज देणे पसंत करतात.

## <u>भांडवल उभारणी</u>

कंपनी संस्थापनेनंतरच्या शेवटच्या दोन पायऱ्या म्हणजे भांडवल उभारणी आणि व्यवसायाची सुरवात या होत. कंपनीच्या संस्थापनेनंतर खासगी किंवा सार्वजनिक कंपनीकडे ताबडतोब व्यवसायाची सुरूवात करण्याकरिता भाग भांडवल नसते. त्यामुळे कंपनी संस्थापनेनंतर भांडवल उभारणी आणि व्यवसाय सुरूवात या दोन अवस्थांमधून कंपनीला जावे लागते.

अ) भांडवली सदस्यता उभारणी अवस्था :

या अवस्थेत किंवा पायरीमध्ये कंपनी केवळ आवश्यक भांडवलाची उभारणी करते. या अवस्थेत पुढील पायऱ्यांचा समावेश होतो १) संचालक मंडळांच्या प्रथम सभेचे आयोजन करणे. २) सचिवाची नियुक्ती करणे, ३) प्राथमिक करारांचा स्वीकार. ४) व्यवस्थापकीय संचालक, व्यवस्थापक आणि इतर पदाधिकाऱ्यांची नियुक्ती करणे. ५) बँक व्यवसायी, लेखापरिक्षक, कायदेतज्ज्ञांची नियुक्ती करणे, ६) जवळच्या शेअर बाजाराशी व्यवस्था सूची तयार करणे. ७) सेबीच्या मार्गदर्शनपर तत्त्वांचा अभ्यास करून त्यानुसार कार्यवाही करणे. ८) विविध करारपत्रांचे लेखन करणे. ९) माहिती पत्रक तयार करणे व बँकर, व्यवस्थापक यांची नियुक्ती करणे. १०) किमान भागभांडवल उभारणीची खात्री करणे.

ब) माहिती पत्रकाची प्रत दाखल करणे :

सेबीच्या मार्गदर्शक तत्त्वांची निश्चिती झाल्यानंतर कंपनीचे संचालक माहिती पत्रकाची प्रत कंपनी निबंधकाकडे सादर करतात. त्यानंतर माहितीपत्रकाचे परिचालन करून लोकांना कंपनीचे भाग खरेदी करण्यासाठी आमंत्रित करतात.

क) अर्ज:

लोकांना कंपनीकडे अर्ज दाखल करावे लागतात. हे अर्ज कंपनीला त्यांच्या बँक व्यावसायिकांमार्फत प्राप्त होतात. जर आवश्यक असणाऱ्या भांडवलापैकी ९०% भांडवल संग्रहित झाले आणि इतर सर्व वैध वाटप अटींची पूर्तता झाली तर संचालक वाटपाचा औपचारिक ठराव मंजूर करतात.

ड) वाटप:

वाटप पत्रे ही टपालाद्वारे पाठवली जातात. वाटप परतावे हे निबंधकाकडे दाखल केले जातात. वाटपपत्रांच्या बदल्यात नियतभागींना भागप्रमाण पत्रांचे परिचलन केले जाते.

इ) न्यून संग्रहित भांडवल परिस्थिती :

जर संग्रहित भांडवल, भांडवल संग्रहणाच्या न्यून मर्यादपेक्षा देखील कमी असेल तर सर्व वित्त परत करावे लागते आणि 'भाग वाटप केले जात नाही.

## <u>व्यवसायाची सुरुवात/ व्यवसायाचा प्रारंभ</u>

२०१३ च्या कंपनी अधिनियमानुसार जर कंपनीच्या संचालकांनी घटनापत्रानुसार मान्य केलेल्या भागांच्या मूल्याच्या देयकाशी संबंधित घोषणापत्रक जर निबंधकाकडे कंपनीच्या संस्थापनेनंतर १८० दिवसांच्या आत सादर केलेले नसेल तर नोंदणीकृत कंपन्यांच्या नावातून कंपनीचे नाव काढून टाकले जाते.

खासगी कंपन्या "व्यवसाय प्रारंभ प्रमाणपत्र मिळाल्यानंतर लगेच व्यवसाय सुरू करतात; पण सार्वजनिक कंपन्यांना असे करू शकत नाहीत. सार्वजनिक कंपन्यांना त्यांचा व्यवसाय सुरु होण्यापूर्वी असे प्रमाणपत्र मिळणे गरजेचे असते.

पुढील दस्तऐवज कंपनी निबंधकाकडे सादर झाल्यानंतर व्यवसाय प्रारंभाचे प्रमाणपत्र कंपनीला प्राप्त होते.

१) माहितीपत्रकात नमूद केल्याप्रमाणे न्यून संग्रहित रक्कमेचे वाटप देय रोख रकमेत झालेले असल्याचे घोषणापत्र.

२) प्रत्येक संचालकाने अर्जाची देय रक्कम जमा केलेली आहे आणि इतरांच्या प्रमाणातच त्याच्या भागांचे वाटप झालेले आहे.

३) संचालकांनी त्यांच्या गुणवत्ता भागांची खरेदी केल्याचे घोषणापत्र.

४) माहितीपत्रकाची प्रत किंवा माहितीपत्रकाऐवजीचे निवेदन.

५) कंपनीला कोणत्याही भागासाठी वित्त देयाची गरज नाही किंवा स्टॉक एक्सचेंजचे प्रमाणपत्र मिळाले याचे घोषणापत्र.

६) प्रत्येक वैधानिक किंवा कायदेशीर औपचारिकतेची पूर्तता झाली असल्याचे घोषणापत्र, ज्यावरती कंपनी सेक्रेटरीची स्वाक्षरी झालेली असेल.

वरील कागदपत्रे निबंधकासमोर सादर झाल्यानंतर निबंधक त्या दस्तऐवजांची छाननी करतो व त्यानंतर सादर झालेल्या दस्तऐवजांबाबतीत तो जर समाधानी असेल तर निबंधक 'व्यवसाय प्रारंभ प्रमाणपत्र देतो.

---

संदर्भ ग्रंथ -


- कंपनी कायद्याचे घटक -I -डॉ. गोविंद डुंबरे ,डॉ. शिवाजी टाकळकर ,डॉ. आशा कदम-पेंढारी
- कंपनी कायद्याची मुलतत्वे – प्रा. सुरेश भिरूड आणि इतर
- कंपनी कायद्याची मुलतत्वे(भाग १) – डॉ. धीरज झाल्टे आणि इतर
- Elements of Company Law - Sultan Chand & Sons
- Elements of Company Law - N.D. Kapoor
- Elements Of Company Law- Prof. Prakash N. Chaudhary